http://www.sgbauonline.com/



# B.A. (Part—I) Semester—I Examination
## MARATHI LITERATURE
## (Literature of Modern Language)
## (Optional)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना :—** (1) बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या.

(2) प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करताना गृहित धरल्या जातील.

1. संदर्भासह स्पष्टीकरण करा :

(अ) "कसंबी कर, पण एवढी पाण्याची टाकी देच. माहं गिऱ्हाईक वापस चाललं पाण्यापायी. तुले एका टाकीचे शंभर रुपये देतो."

किंवा

"आवं पण ले माहयाच बैलायच्या भरोशावर कमवाय लागली नं 1 मोठी टेकीत गोष्टी करा लागलीत."

(ब) "कास्तकार असतानं तुमी. मी आता धंद्यावाला झालो. पाण्याचा व्यापारी."

किंवा

"पाच हजारात काय ऊद जळते बाबू, दहा हजाराच्या खाली तयार नाही तोताराम. नाईत देतो म्हन्ते रिपोट."

(क) एक तुतारी द्या मज आणुनि,
फुंकिन मी जी स्वप्राणाने,
भेदुनि टाकिन सगळी गगने,
दीर्घ जिच्या त्या किंकाळीने;
अशी तुतारी द्या मजलागुनी.

किंवा

स्वर्ग नको सुरलोक नको मज लोभस हा इहलोक हवा तृप्ती नको मज मुक्ति नको पण येथिल हर्ष नि शोक हवा.

(ड) हाकेवर आहे गाव
आज आशेने चाललें,
गेले दिवस-महिने;
वाटे युगच संपलें.

किंवा

रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे
कधी फाटका बाहेर कधी फाटका आत आहे
कामगार आहे मी तळपती तलवार आहे
सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा करणार आहे. 16

2. 'राघोजी' ची व्यक्तिरेखा साकारा.

किंवा

'तहान' या शीर्षकाची यथार्थता स्पष्ट करा. 16

3. (अ) 'तहान' कादंबरीतील बबन आणि रत्नाच्या प्रेमसंबंधावर थोडक्यात प्रकाश टाका.

किंवा

'तहान' कादंबरीतील भाषेचे वेगळेपण स्पष्ट करा. 8



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(ब) 'तहान' कादंबरीतील तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही एका प्रसंगाचे वर्णन करा.

किंवा

''तहान' ही कादंबरी ग्रामीण जीवनातील मूल्यांच्या पडझडीचे चित्र रेखाटते'' या विधानाची यथार्थता पटवा. 8

4. (अ) मर्ढेकरांच्या कवितांची प्रतिमासृष्टी उलगडून दाखवा.

किंवा

सामाजिक विषमतेची जाणीव कुसुमाग्रजांच्या काव्यातून कशी व्यक्त होते ? 8

(ब) नारायण सुर्वे यांच्या कवितेतील जीवनसंघर्ष स्पष्ट करा.

किंवा

खालीलपैकी **एका** कवितेचे रसग्रहण करा :

(1) नवा शिपाई

(2) मृण्मयी

(3) माझ्या मना बन दगड. 8

5. खालील वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नातील अचूक उत्तर निवडा :

(1) बबन पाण्याची टाकी कोणत्या शेतातून भरून आणायचा ?

(अ) देवराव बापू (ब) सखाराम बापू

(क) शामराव बापू (ड) भीमराव बापू

(2) हातपंपावर कोणाचे भांडण सुरू होते ?

(अ) वर्षा-रत्ना (ब) द्वारका-तारा

(क) राधा-गोदा (ड) रामकोर-वर्षा

(3) पाण्याची टाकी भरून आणताना कोणता चढ लागत असे ?

(अ) पिराचा (ब) मालटेकडीचा

(क) गावखारीचा (ड) हनुमान टेकडीचा

(4) प्रमोद नवले हा कोणत्या वृत्तपत्राचा वार्ताहर होता ?

(अ) लोकमत (ब) लोकसत्ता

(क) जनवार्ता (ड) भास्करवार्ता

(5) ________ जवळची हापशी म्हणून सगळ्या गावात हा हातपंप ओळखला जायचा.

(अ) वड (ब) गोंधणी

(क) पिंपळ (ड) उंबर

(6) गावात ________ चोरीची अफवा पसरली होती.

(अ) दागिणे (ब) बैलजोडी

(क) किडनी (ड) कडबा



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(7) बबनने रामकोरच्या संदुकातून ________ रुपये घेतले.

(अ) तीन हजार (ब) पाच हजार

(क) सात हजार (ड) दहा हजार

(8) उपोषणाकरिता ________ कार्यालयासमोर पाल टाकण्यात आले.

(अ) शाळा (ब) ग्रामपंचायत

(क) देवस्थान (ड) पतसंस्था

(9) स्वप्राणाने काय फुंकण्यास कवी तयार आहे :

(अ) बासरी (ब) बाजा

(क) तुतारी (ड) सनई

(10) गणपत वाणी बिडी पितांना काय चापायचा :

(अ) चाबी (ब) बिडी

(क) काडी (ड) बोट

(11) आगगाडीने दुर्बल व भेकड कोणाला म्हटले आहे ?

(अ) जमीन (ब) नदी

(क) डोंगर (ड) समुद्र

(12) कशाचे सत्व भाषा-शरीराला लाभावे असे बा.सी. मर्ढेकरांना वाटते ?

(अ) द्रौपदीचे (ब) कुंतीचे

(क) सुभद्राचे (ड) गांधारीचे

(13) जिकडे सत्ता तिकडे पोळी; जिकडे सत्य तिकडे ________ .

(अ) भात (ब) भाजी

(क) गोळी (ड) मोळी

(14) ________ चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली.

(अ) आकाशातील (ब) चेहऱ्याचा

(क) शीतलतेचा (ड) भाकरीचा

(15) आम्ही कोण म्हणुनि काय पुससी ? आम्ही असू ________.

(अ) प्रिय (ब) आवडते

(क) लाडके (ड) नावडते

(16) इंदिरा संत यांच्यामते रक्तामध्ये ________ ओढ आहे.

(अ) मातीची (ब) पैसाची

(क) प्रेमाची (ड) सुखाची 16



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/